पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता

नगरसचिव कार्यालय,
पुणे महानगरपालिका
दिनांक : २४/१२/२०१०

पुणे महानगरपालिका

✷ सूचना ✷

(मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे परिशिष्ठ भाग २ मधील
नियम क्रं.१(डी) (एच) व (आय) अन्वये)

**कार्यपत्रिका क्रमांक – ११**

**(खास सभा)**

**मा. ॲड. निलेश निकम, सभागृहनेते, मा. बाबू वागसकर, मा. चाँदबी नदाफ, मा. सुनिल टिंगरे, मा. विजय देशमुख, मा. अशोक हरणावळ, मा. बंडू गायकवाड, मा. सौ. मेधा कुलकर्णी, मा. उज्वल केसकर, मा. सौ. दिपाली धुमाळ व मा. संतोष आरडे या स्थायी समितीच्या ११ (अकरा) मा.सभासदांकडून दिनांक २४/१२/२०१० रोजी लेखी मागणी (रिक्वीझिशन) आल्यावरुन पुणे महानगरपालिकेची विशेष (खास ) सभा गुरुवार, दिनांक ३०/१२/२०१० रोजी दुपारी ४=०० (चार) वाजता श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात (मनपा सभागृहात) भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**विषय क्रं. ४६०**

संदर्भ :– मा.शिक्षण मंडळ ठराव क्र. १४२, दि. २६/८/२०१०.

––––

पुणे मनपा शिक्षण मंडळाचे सन २०१० – २०११ चे पुणे मनपा मुख्य सभेने मान्य केलेल्या मूळ अंदाजपत्रकामध्ये केलेल्या तरतुदीमध्ये कोणत्याही प्रकारची वाढ किंवा दुरुस्ती न सुचवता पुणे मनपावर कोणताही अधिभार न देता मंजूर अंदाजपत्रकानुसार खर्च करणेस मान्यता देण्यात येत आहे.

**(टिप :– शिक्षण मंडळाचे सन २०१० – २०११ चे दुरुस्त व पुरवणी अंदाजपत्रकात योग्य त्या दुरुस्त्या व फेरफार करुन ते मान्य करण्यासंबंधी स्थायी समिती ठ. क्र. २००८, दि. २४/१२/२०१० ने मनपाकडे शिफारस आहे.)**

**विषय क्रं. ४६१**

संदर्भ :– मा.शिक्षण मंडळ ठराव क्र. १४३, दि. २६/८/२०१०.

––––

पुणे मनपा शिक्षण मंडळाचे सन २०११ – २०१२ चे मूळ अंदाजपत्रक खालीलप्रमाणे बाबवार मान्य करण्याबाबत पुणे मनपाकडे शिफारस करण्यात येत आहे.

| | जमा बाजू | रुपये | | खर्च बाजू | रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १) | वर्षारंभीची शिल्लक | ५०,०००/– | १) | सेवकवर्ग पगार | १,३७,३२,६५,०००/– |
| २) | पुणे मनपा हिस्सा | १,९८,७७,००,०००/– | २) | कार्यालय खर्च | ८७,९५,०००/– |
| ३) | शासकीय अनुदान | ५०,००,००,०००/– | ३) | प्राथमिक शाळा खर्च | ५७,१०,६०,०००/– |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४) | इतर जमा | ९३,२०,०००/– | ४) | सेवानिवृत्ती वेतन, ग्रॅच्युइटी | ४५,००,५०,०००/– |
| ५) | अनामत, उचल व विश्वस्त निधी व्याज | ३,१७,०४,०००/– | ५) | खाजगी शाळा अनुदान | १०,००,०००/– |
| | | | ६) | नैमित्तीक खर्च | ९,२८,५०,०००/– |
| | | | ७) | अनामत उचल व विश्वस्त निधी व्याज | ३,१७,०४,०००/– |
| | | | ८) | वर्षाअखेरची शिल्लक | ५०,०००/– |
| | **एकूण रुपये** | २,५२,८७,७४,०००/– | | **एकूण रुपये** | २,५२,८७,७४,०००/– |

टिप :–

१) शिक्षण मंडळाने सादर केलेले जमा व खर्चाचे सन २०११ – २०१२ चे मूळ अंदाजपत्रक स्थायी समिति ठ. क्र.२००९, दि. २४/१२/२०१० ने योग्य त्या दुरुस्ती व फेरफार करुन ते मान्य करणे विषयी मनपाकडे शिफारस केली आहे.

२) सन १९४९ च्या मुंबई प्राथमिक शिक्षणाबाबत नियम क्र. १५४ (२) अन्वये सदर अंदाजपत्रक दि. १ जानेवारी पर्यंत (बाय दि फस्ट जानेवारी) मुख्य सभेने मान्य करावयास पाहिजे.

नगरसचिव कार्यालय,
पुणे महानगरपालिका
शिवाजीनगर पुणे ४११००५
दिनांक :– २४/१२/२०१०

मा. महापौर यांचे आज्ञेवरुन,

सुनिल पारखी,
नगरसचिव,
पुणे महानगरपालिका

(टिप :–प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) मा.नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)